॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 | ESTABLISHMENT SECTION | website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 | E-mail: registrar@srtmun.ac.in

**रुसा व पी एम - उषा अंतर्गत सर्व संस्था यांनी राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) कार्यालयातील सर्व पत्रव्यवहार मराठी मध्ये करणे बाबत...**

## :: परिपत्रक ::

प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, विभाग प्रमुख आणि प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय-मराठी भाषा विभाग क्रमांक : भासस-२०१८/प्र.क्र.५०/भाषा-१, दिनांक: १४.०३.२०२४ नुसार मराठी भाषा विभागाने राज्याचे मराठी भाषेचे धोरण जाहीर केले आहे. ज्यात संवाद, आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी व्यवहारक्षेत्रनिहाय काही शिफारसी आहेत आणि मराठी भाषा धोरणातील शिफारसींच्या अंमलबजावणीबाबत शासन परिपत्रक दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ नुसार या धोरणाच्या शिफारशींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशान्वये सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन महामंडळे, शासन अनुदानित कार्यालयांमध्ये अभ्यागतांशी व अभ्यागतांनी (परदेशस्थ व राज्याबाहेरील अमराठी व्यक्ती वगळता) मराठी भाषेमधून संभाषण करणे अनिवार्य असेल. तसेच मराठी भाषेचा वापर व मराठीमध्ये संभाषण करण्याबाबत कार्यालयांमध्ये दर्शनी भागात फलक लावणेही अनिवार्य असेल.

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अनुसार वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय कार्यालयांतील मूळ प्रस्ताव, सर्व पत्रव्यवहार, टिप्पण्या, आदेश, संदेशवहन मराठीतच असतील व कार्यालयीन स्तरावरील सर्व प्रकारची सादरीकरणे मराठीत असतील.

मराठी भाषा धोरणातील शिफारसींच्या अंमलबजावणीबाबत शासन परिपत्रक दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ नुसार रुसा व पी एम -उषा अंतर्गत सर्व संस्था यांनी राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) कार्यालयातील सर्व पत्रव्यवहार (केंद्र शासनास सादर करावयाची माहिती उदा. उपयोगिता प्रमाणपत्र इ.वगळता) मराठीमध्ये करावे.

उक्त परिपत्रकाची सर्व संबंधितांनी नोंद घेवून याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

**जा.क्र.** : आस्था/०३/२०२५-२६/१०५१
दिनांक: १५/०७/२०२५

प्रा.डॉ.ज्ञानेश्वर डी.पवार
(प्र.कुलसचिव)

**संदर्भ** : राप्रसं/रुसा/२०२५-२६/२९०,
दिनांक: ०३/०७/२०२५

**प्रत कार्यवाहीस्तव :-**

०१. मा.समन्वयक, रुसा व पी एम उषा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
०२.मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
०३.मा.विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
०४.मा.संचालक, विद्यापीठ उप-परिसर, लातूर व परभणी
०५.मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली
०६.मा.समन्वयक, कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट
०७. सिस्टीम एक्सपर्ट, यांना याची एक प्रत देवून कळविण्यात येते की, सदर सूचना विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.

**प्रत माहितीस्तव:-**

०१.मा.कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
०२. मा.प्र.कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ